18 JAN 2018
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# समाजमन तयार करण्यात पत्रकारांचा मोठा वाटा : डॉ. जत्राटकर

**कोथळी / प्रतिनिधी :**

चांगले समाजमन तयार करण्यात पत्रकारांचा खूप मोठा वाटा आहे. पत्रकारांनी विकासकामात लोकसहभाग वाढवण्यासाठी आपल्या लेखणीचा जास्तीत जास्त वापर करावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. अलोक जत्राटकर यांनी केले.

दानोळी येथे पत्रकार दिनानिमित्त आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी डीवाय.एस.पी. कृष्णात पिंगळे होते. पिंगळे म्हणाले, पत्रकार हे जनता आणि पोलीस यांच्यामधील महत्त्वाचा दुवा आहेत. पोलीस आणि पत्रकारांनी एकत्रित काम केल्यास समाजातील बंधुभाव वाढीस लागेल.



**दानोळी : येथे कार्यक्रमाच्या उद्‌घाटनप्रसंगी डॉ. अलोक जत्राटकर, कृष्णात पिंगळे व इतर.**

यावेळी सहायक पोलीस निरीक्षक दत्तात्रय कदम, जिल्हा परिषदेच्या महिला व बालकल्याण सभापती शुभांगी शिंदे, पंचायत समिती सदस्य सुरेश कांबळे, सरपंच सुजाता शिंदे, राजकुमार पाराज यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी पंचायत समिती सदस्य राजगोंड पाटील, काँग्रेसचे तालुकाध्यक्ष सर्जेराव शिंदे, चिपरीचे सरपंच धनपाल कनवाडे, निशिरगावच्या सरपंच बनाबाई कांबळे, कवठेसारच्या सरपंच दीपाली भोकरे, उमळवाडचे सरपंच आर. वाय. कांबळे, उपसरपंच गब्रू गावडे, सुकुमार नेजकर, शाबिरा फकीर, सुनीता पुजारी, सरिता भवरे, सुकुमार सकाप्पा, बापूसो दळवी, केशव राऊत, विश्राम चव्हाण, गुंडू दळवी, सागर चिप्परगे, वृषभ पाटील, धनपाल खिलारे, जयकुमार पाराज, संदीप पवार, राजेंद्र पिसे आदी उपस्थित होते. स्वागत व प्रास्ताविक संघाचे अध्यक्ष मनोजकुमार शिंदे यांनी केले. सूत्रसंचालन प्रकाश राऊत यांनी केले. आभार जमीर मुजावर यांनी मानले.

18 JAN 2018

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# मायक्रोबायोलॉजी विषय म्हणजे नोकरीचा खजिना

## - डॉ. कैलास सोनावणे : शिवराज महाविद्यालयात मायक्रोबायोलॉजी विभागाचे उद्घाटन

**गडहिंग्लज / प्रतिनिधी :** मायक्रोबायोलॉजी हा विषय अत्यंत महत्त्वाचा व आजच्या घडीला गरजेचा आहे. मायक्रोबायोलॉजी विषयातून विद्यार्थ्यांना करिअर करण्याची खूप संधी आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांनी कष्टप्रद अभ्यास करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ मायक्रोबायोलॉजी विभागाचे प्रमुख डॉ. के. डी. सोनावणे यांनी केले. येथील शिवराज महाविद्यालयात मायक्रोबायोलॉजी विभागाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे होते.

प्राचार्य डॉ. एस. वाय. कोतमिरे यांनी स्वागत केले. प्रा. एन. बी. काळोजी यांनी पाहुण्यांची ओळख करुन दिली. डॉ. सोनावणे म्हणाले, खरा विद्यार्थी हा कठोर परिश्रमातून घडत असतो याची जाणीव त्यांनी आपल्याला आलेल्या अनुभवातून सांगितले. विद्यार्थ्यांनी एक ठरावीक उद्दिष्ट ठेवून आपले करिअर मायक्रोबायोलॉजीमधून करणे आवश्यक आहे. या क्षेत्रात नोकरी हमखास मिळते, असा विश्वासही डॉ. सोनावणे यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठाच्या मायक्रोबायोलॉजी डिपार्टमेंटमधून पदवी घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रात नोकरी मिळाल्याचे सांगितले. तसेच मायक्रोबायोलॉजी विषयातून पदवी किंवा पदव्युत्तर शिक्षण घेताच संशोधन, औषधशास्त्र, हॉटेल व्यवस्थापन, आरोग्य विभाग, स्वतःची प्रयोगशाळा आदी माध्यमातून आयुष्य घडविता येते, असे त्यांनी सांगितले. मायक्रोबायोलॉजी विषयातून निश्चितपणे योग्य करिअर होऊ शकते असा विश्वास व्यक्त केला.

मायक्रोबायोलॉजी, वनस्पतीशास्त्र, रसायनशास्त्र, पदार्थविज्ञान, संगणकशास्त्र विषयातील विद्यार्थी व शिक्षकांनी एकत्रित येऊन खूप चांगले संशोधन सुरू करू शकतात, असे स्पष्ट करुन त्यांनी विद्यार्थ्यांना हा विषय निवडून पुढील शिक्षणासाठी शिवाजी विद्यापीठात येण्याचे आवाहन केले. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा. किसन कुराडे यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास डॉ. ए. ए. पोवार, नंदनवाडे गुरुजी, के. बी. पेडणेकर, व्ही. एन. गजेंद्रगडकर, अनिल कुराडे, डी. आर. खटके, जे. व्ही. सरतापे, बी. डी. अजळकर, किशोर अदाटे, कल्याणी काळगे यांच्यासह विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते. एस. के. नेर्ले यांनी आभार मानले.

1 8 JAN 2018 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# स्टुडंट कौन्सिलसाठी महाविद्यालयीन सचिवपदाची अंतिम यादी जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील शैक्षणिक वर्ष २०१७-१८मधील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात येणार आहेत. महाविद्यालय पातळीवरील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकांसाठी वर्गप्रतिनिधींच्या निवडीनंतर बुधवारी महाविद्यालय पातळीवरील सचिवपदाची अंतिम यादी जाहीर करण्यात आली. तर दि. २४ रोजी महाविद्यालयीन पातळीवरील 'स्टुडंट कौन्सिल' सचिवपदाची निवडणूक होईल.

महाविद्यालय पातळीवरील स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकीसंदर्भात गेल्या आठ दिवसापासून महाविद्यालय पातळीवर धावपळ सुरू आहे. विद्यार्थ्यांची नियुक्ती, वर्गप्रतिनिधींसह प्राचार्य नियुक्त प्रतिनिधींचे अर्ज भरून घेणे, सचिवपदाची अंतिम यादी यामध्ये महाविद्यालय प्रशासन व विद्यार्थी व्यस्त होते. तर २४ जानेवारी रोजी होणाऱ्या स्टुडंट कौन्सिल सचिवपदाच्या निवडणूकीची महाविद्यालयांनी जय्यत तयारी केली आहे.



### विद्यापीठ अधिविभाग स्तरावरील स्टुडंट कौन्सिल निवडणूक कार्यक्रम

- १ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील सचिवपदासाठी अर्ज दाखल
- २ फेब्रुवारी रोजी 'स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूक' निवड समितीची बैठक
- ५ फेब्रुवारी कुलगुरू नियुक्त विद्यार्थ्यांची नावे जाहीर होणार
- ६ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील सचिव पदासाठीच्या स्टुडंट कौन्सिलच्या निवडणूकीसाठी नोटीस दिली जाणार.
- २७ फेब्रुवारी विद्यापीठ पातळीवरील अध्यक्ष व सचिवपदासाठी निवडणुक

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 JAN 2018
पुण्यनगरी

# महाविद्यालयाच्या सचिवपदाची यादी जाहीर

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या शैक्षणिक वर्ष २०१७-१८ च्या स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुका मेरीटनुसार घेण्यात येणार आहेत. महाविद्यालय पातळीवर स्टुडंट कौन्सिलच्या निवडणुकीसाठी वर्गप्रतिनिधींच्या निवडीनंतर बुधवारी महाविद्यालय पातळीवर सचिवपदाची अंतिम यादी जाहीर करण्यात आली.

गेल्या काही दिवसांपासून महाविद्यालयांत सचिवपदाच्या निवडीची लगबग सुरू होती. विद्यार्थ्यांच्या नियुक्ती, वर्गप्रतिनिधीसह प्राचार्य नियुक्त प्रतिनिधींचे अर्ज भरून घेणे, सचिवपदाची अंतिम यादी आदी कामांमध्ये विद्यार्थी व्यस्त होते, तर २४ जानेवारी रोजी होणाऱ्या विद्यार्थी मंडळाच्या सचिवपदाच्या निवडणुकीची जय्यत तयारी सध्या सुरू आहे.